# अमरावती महानगरपालिका, अमरावती.

राजकमल चौक, अमरावती.

सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र.अमनपा/साप्रवि/ ६३ /२०२२ दि. २२/०६/२०२२.

## प्रेस नोट

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२२ च्या अनुषंगाने प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी आज गुरुवार, दिनांक २३ जून २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर यादी अमरावती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (https://amravaticorporation.in/) तसेच प्रभागाची यादी संबंधित क्षेत्रीय कार्यालयामध्ये पाहण्यास उपलब्ध असेल. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी त्यांचे नाव त्यांच्या प्रभागाच्या प्रारूप मतदार यादीमध्ये असल्याची खात्री करावी. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार दिनांक ३१ मे २०२२ रोजी पर्यंतची विधानसभा मतदारयादी ग्राह्य धरून त्याची प्रभागनिहाय विभागणी करून प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे इत्यादी स्वरुपाची कामे राज्य निवडणूक आयोगामार्फत केली जात नाहीत. दिनांक ३१ मे २०२२ रोजीच्या विधानसभा मतदार यादीमध्ये ज्यांची नावे आहेत अशा मतदारांनाच सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

सदर प्रारूप मतदार यादी शुद्ध स्वरुपात व त्रुटीविरहीत होण्याच्या दृष्टीने सदर यादीवर हरकती व सूचना मागविण्यात येत असून हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी दिनांक २३ जून २०२२ ते १ जुलै २०२२ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत असणार आहे. हरकत / सूचना संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे अथवा मुख्य निवडणूक कार्यालय, महानगरपालिका, राजकमल चौक, अमरावती येथे दाखल करता येईल. हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखानिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे या संदर्भातील दुरुस्त्या करण्यात येतील. तरी अमरावती शहराच्या नागरिकांनी कृपया आपले नाव प्रभागाच्या प्रारूप मतदारयादीमध्ये असल्याची खातरजमा करावी.

(डॉ. प्रविण आष्टीकर)
आयुक्त,
महानगरपालिका, अमरावती

POCO
SHOT ON POCO F1